आदिवासी उमेदवारांसाठी सेवायोजन
प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र.

रावेर, जि. जळगाव व अचलपूर, जि. अमरावती.

महाराष्ट्र शासन
शिक्षण व सेवायोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक-इएमपी १०८४/७३०६/[७७७१]/सेयो-२
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक- ११ ऑक्टोबर, १९८४

संदर्भ:- सेवायोजन संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.
१] डीई-पांच/प्लॅन/३५१९३-९५, दिनांकित ३०.१२.८३ व
२] डीई पांच/प्लॅन/२५५३७-३८, दिनांकित ८.१०.१९८४

शासन निर्णय:- विविध शासकीय व निमशासकीय संस्थांमध्ये आदिवासी उमेदवारांसाठी राखीव पदे असतात परंतु ती पदे स्पर्धात्मक परीक्षांव्दारे उमेदवारांची निवड करुन भरण्यांत येतात. या स्पर्धात्मक परीक्षांच्या स्वरुपाबद्दल आदिवासी उमेदवारांना माहिती देऊन त्या उत्तीर्ण होण्यासाठी त्यांना मार्गदर्शन व प्रशिक्षणाची आवश्यकता असते असे दिसून आल्याने प्रामुख्याने आदिवासी वस्ती असलेल्या परिसरात खास आदिवासी उमेदवारांसाठी प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्रे स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या योजनेचे स्वरुप पुढीलप्रमाणे राहील:-

१] या केंद्रात शालांत परीक्षा उत्तीर्ण/पदवीधर उमेदवारांना प्रशिक्षण देण्यांत येईल.

२] प्रशिक्षणाचे सत्र ३ महिन्यांच्या कालावधीचे व पूर्ण वेळ असेल.

३] प्रत्येक केंद्रात एका सत्रात २० ते २५ प्रशिक्षार्थी आदिवासी उमेदवारांना प्रवेश दिला जाईल.

४] प्रशिक्षणाच्या काळात उमेदवारांची शक्यतो मागासवर्गीय वसतीगृहात निवास व भोजनाची व्यवस्था केली जाईल.

५] मागासवर्गीय वसतीगृहात निवास व भोजनाची सोय झाल्यास शालांत परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांस मासिक रु. १००/- व पदवीधर उमेदवारांस मासिक रु. १५०/- विद्यावेतन मिळेल.

६] प्रशिक्षार्थ्यांची निवास व भोजनाची सोय मागासवर्ग वसतीगृहात करणे शक्य झाले नाही तर अशा प्रशिक्षार्थ्यांना आपली निवास व भोजनाची व्यवस्था इतरत्र करावी लागेल व शालांत परीक्षा उत्तीर्ण प्रशिक्षार्थ्यास मासिक रु. २००/- व पदवीधर प्रशिक्षार्थ्यास मासिक रु. २५०/- विद्यावेतन मिळेल.

७] केंद्रात प्रवेश घेणाऱ्या प्रशिक्षार्थी उमेदवारांना विविध आस्थापनांतील भरतीबाबत माहिती देण्यात येऊन त्यांना मुलाखत तंत्र व स्पर्धा परीक्षांचे स्वरुप याबाबत मार्गदर्शन व प्रशिक्षण देऊन त्यांची या

//२//

८) केंद्रामध्ये संबंधित विषयातील तज्ञांना बोलावून त्यांची व्याख्याने आयोजित करण्यांत येतील.

९) व्याख्याने देण्यासाठी आमंत्रित केलेल्या तज्ञांना प्रत्येक व्याख्यानाला रु. २५/- या दराने मानधन देण्यांत येईल.

१०) ज्या व्याख्यात्यांना बाहेरगावाहून पाचारण करण्यात येईल त्यांना मानधनाव्यतिरिक्त प्रथम श्रेणीच्या शासकीय अधिका-यां- प्रमाणे प्रवासभत्ता देण्यात येईल.

२. या योजनेखाली प्रथम दि. १ नोव्हेंबर १९८४ पासून [१] रावेर, जि. जळगाव व [२] अचलपूर, जिल्हा अमरावती येथे आदिवासी सेवायोजन प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र मंजूर करण्यात येत आहेत. त्या केंद्रांच्या व्यवस्थेसाठी प्रत्येकी पुढील पदे मंजूर करण्यांत आली आहेत:-

| | पद | वेतनश्रेणी रुपये | | पदांची संख्या | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | उपप्रादेशिक सेवायोजन अधिकारी | ६००-३०-७५०-दरो-४०-११५० | प्रत्येकी | १ | २ |
| २. | कनिष्ठ सेवायोजन अधिकारी. | ३९५-१५-५००-२०-७०० विस्तार-२०-८०० | " | १ | २ |
| ३. | लिपिक | २६०-१०-३९०-१५-४२०- विस्तार-१५-४९५ | " | १ | २ |
| ४. | टंकलेखक | वरील प्रमाणे | " | १ | २ |
| ५. | शिपाई | २००-३-२३०-५-२५५-विस्तार -५-२८५. | " | १ | २ |
| | | | एकूण " | ५ | १० |

ही पदे प्रथमत: दि. २८ फेब्रुवारी १९८५ पर्यंत मंजूर करण्यांत आली असून ती धारण करणारे अधिकारी/कर्मचारी शासनाने वेळोवेळी मंजूर केलेले सर्व भत्ते मिळण्यास पात्र रहातील. केंद्रांचे प्रभारी उपप्रादेशिक सेवायोजन अधिकारी हे कार्यालय प्रमुख व केंद्रातील कर्मचा-यांचे वेतन, भत्ते व व्याख्यात्यांचे मानधन, भत्ते इत्यादींसाठी आहरण व वितरण अधिकारी म्हणून काम करतील.

३. या दोन्ही आदिवासी सेवायोजन प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्रांसाठी येणा-या खर्चाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| आवर्ती खर्च | रावेर केंद्र | अचलपूर केंद्र | एकूण |
|---|---|---|---|
| वेतन खर्च रुपये | १८,५०० | १८,५०० | ३७,००० |
| प्रवास खर्च रुपये | ५०० | ५०० | १,००० |

| | | | |
|---|---|---|---|
| व्याख्यात्यांना मानधन रु. | ३,००० | ३,००० | ६,००० |
| विद्यावेतन रुपये | ७,००० | ७,००० | १४,००० |
| एकूण आवर्ती रु. | ३१,००० | ३१,००० | ६२,००० |

अनावर्ती खर्च

| | | | |
|---|---|---|---|
| टंकलेखन यंत्र रुपये | ६,००० | ६,००० | १२,००० |
| फर्निचर व इतर साहित्य रु. | १४,००० | ३०,००० | ४४,००० |
| एकूण अनावर्ती | २०,००० | ३६,००० | ५६,००० |

एकूण खर्च रुपये १,१८,०००

४. वरील खर्च मागणी क्र. २०१८ मुख्यलेखाशीर्ष "२८७-कामगार व सेवायोजन पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-आदिवासी विभाग उपयोजना-बी-सेवायोजन व प्रशिक्षण [दोन] सेवायोजन कार्यालये [२] प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्रे स्थापन करणे" या शीर्षाखाली खर्ची टाकून नोव्हेंबर १९८४ या खर्च शासन ज्ञापन, वित्त विभाग क्र. सीएन्ट एफ ११८४/१०४/बीयुडी-२, दिनांकित २० सप्टेंबर १९८४ अन्वये आकस्मिकता निधीतून मंजूर करण्यात आलेल्या अग्रिमातून करण्यात यावा.

५. हे आदेश नियोजन विभाग, आदिवासी विकास विभाग व वित्त विभाग यांच्या वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. सीआर १५१२ /इएक्सपी-५, दिनांकित ५.७.८४ ने दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित झाले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ अरविंद चिटणीस ]
सहायक सचिव, महाराष्ट्र शासन.

सेवायोजन संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सेवायोजन उपसंचालक, मुंबई विभाग, कोकण भवन, मुंबई
सेवायोजन उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर
उपप्रादेशिक सेवायोजन अधिकारी, उपप्रादेशिक सेवायोजन कार्यालय, जळगांव/अमरावती
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
महालेखापाल महाराष्ट्र-२ [लेखापरीक्षा] नागपूर
आदिवासी विकास विभाग,
समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
वित्त विभाग
नियोजन विभाग
अर्थ संकल्प-२ कार्यासन, शिक्षण व सेवायोजन विभाग,